(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## March-2020

**SPECIAL ISSUE-CCXXIV(224)**





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor :**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | अहिराणी भाषेतील साहित्य व संस्कृती संवर्धन **डॉ. रत्ना लाला जवरास** | 1 |
| 2 | १९५६ च्या धर्मांतराचा समाजजीवनावर पडलेला प्रभाव डॉ.बी.एच.किर्दक | 6 |
| 3 | पर्यावरण विषय प्रशिक्षणाचा उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांवरील परिणामांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास. विनोद वाघमारे / डॉ. अमोल मांडेकर | 13 |
| 4 | ई—कच—याचे व्यवस्थापन प्रा. डॉ.सुनिल एन. ढेरे. | 17 |
| 5 | वामनराव चोरघडे — एक दृष्टिक्षेप प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 20 |
| 6 | दलित भारतीय कादंबरी : सामाजिक आणि सांस्कतिक अनुबंध प्रा. डॉ.प्रभाकर रामचंद्र पवार | 25 |
| 7 | संतांची शिकवण काळाची गरज प्रा.डॉ.उज्ज्वला पाटील | 33 |
| 8 | कविता—रती' या नियतकालिकातील कवितेतून प्रकटलेल्या महानगरीय जाणिवा डॉ.श्रीकृष्ण पदमणे | 37 |
| 9 | डॉ. बाबासाहब अम्बेडकर का राजनैतिक एवं सामाजिक दर्शन भारत के सन्दर्भ में प्रा. डॉ. यशवंत मेश्राम | 41 |
| 10 | "पश्चिम विदर्भातील एकुण ग्रामीण साक्षरता - एक भौगोलीक अभ्यास" **प्रा. डॉ. राहुल देविदास इंगळे** | 45 |
| 11 | E- Governance मधील उपयोग प्रा. डॉ. संजय उ. उल्हे | 51 |
| 12 | CHESS प्रशिक्षणाचा इंग्रजी शिक्षकांच्या अध्यापनावरील परिणामाचे सर्वेक्षणात्मक अध्ययन पांडुरंग टिकाराम कोळवते / डॉ.अमोल मांडेकर | 54 |
| 13 | वस्त्र धुलाई कला : एक परिचय प्रा.सौ.सुषमा सु. जाजु | 60 |
| 14 | भारतीय अर्थव्यवस्था अधोगतिच्या मार्गाने जाण्याची कारणे व उपाययोजना डॉ. केशव सुर्यभानसा गुल्हाने | 64 |
| 15 | राष्ट्रसंवर्धनात ग्रामगितेचा आरोग्य मार्ग प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख | 68 |
| 16 | बुध्द तत्वज्ञानाचा मराठी संत साहित्यावर प्रभाव **प्रा.डॉ. रजनी भिमराव गेडाम (सोनुले)** | 71 |
| 17 | "उच्च प्राथमिक स्तरावर इतिहास अध्यापनात शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांची परिणामकारकता अभ्यासणे." डॉ.हर्षानंद पं.खोब्रागडे | 74 |
| 18 | महर्षी धोंडो केशव कर्वे आणि स्त्री शिक्षणाची चळवळ प्रा. डॉ. कविता तातेड | 77 |

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) –7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

# E- Governance मधील उपयोग

प्रा. डॉ. संजय उ. उल्हे
श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा रेल्वे

प्रस्तावाना

E- Governance ही नवीन संकल्पना आहे. या संकल्पनेचा वापर करुन इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या आणि विशेषतः संगणकाच्या साहयाने शासन करणे गृहित आहे. परंपरागत पध्दतीने शासनाने कार्य करणे हे फारच जास्त वेळ घेणारे, महागडे आणि अकार्यक्षम ठरत आहे. आता शासनाचे विविध विभाग इंटरनेटच्या साहयाने जोडले जात आहे. अशा प्रकारे एका नेटवर्कमध्ये हे सर्व विभाग आल्याने संदेशवहनाची क्रिया प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्याच प्रमाणे त्यांना येणारा खर्च पण मोठया प्रमाणात कमी झालेला आहे. या सर्वांचे एकत्रीत फळ म्हणजे शासनाची कार्य करण्याची कार्यक्षमता वाढत आहे. जेव्हा शासनयंत्रणा ही इंटरनेटच्या वापर करुन व त्याच प्रमाणे इलेक्ट्रानिक यंत्र उदा. फोन, मोबाईल, फॅक्स, टेलिग्राम इ. चा वापर करुन कार्य करते तेव्हा त्याला ई-गर्व्हनंस असे संबोधले जाते.

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करुन शासनाचे कार्य सुरळीत व सुलभतेने चालणे, शासनाच्या कामकाजात पारदर्शकता यावी म्हणुन भारत सरकारचे ई गव्हर्नन्स धोरणांची विशेष आखणी केली आहे. नागरिक केंद्रित्मता व सेवा प्रदान करणे हया धोरणांची राष्ट्रीय ई गव्हर्नन्स मध्ये समावेश करुन दोन विभाग तयार केले.

१. **शासन ते नागरिक :-**

राष्ट्रातील जनता किंवा नागरिक आणि शासन यांच्यातील संदेशवहनाकरीता वापरले जाणारे तंत्र याला G2C असे म्हटले जाते. या तंत्राचा वापर करुन टॅक्सचे शोधन इंटरनेटच्या माध्यमाने केले जाते. त्यामुळे जनता आणि शासन यांच्या मधील संदेशवहन शक्य होते. शासन ते नागरिक यांचा उपयोग भष्ट्राचारास आळा घालणे करीता वेळेची बचत होण्याकरीता खर्चाची बचत होण्याकरीता खर्चाची बचत होण्याकरीता, उच्च कार्यक्षमता होण्याकरीता व वाढीव कार्य पुर्ण होण्यास होते.

२. **शासन ते व्यवसाय :-**

Government to business या अंतर्गत शासन आणि व्यवसाय यांच्यामध्ये होणारे संदेशवहन समाविष्ट होते या संकल्पनेमुळे शासन किंवा सरकार आणि व्यवसाय दोघांचाही संदेशवहनाकरीता येणारा खर्च कमी केल्या जावु शकतो त्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढते शासन ते व्यवसाय याचा उपयोग मध्यस्थांचे उच्चाटन करण्याकरीता वेळेची बचत होण्याकरीता भष्ट्राचाराला आळा घालण्याकरीता कार्यक्षमता वाढविण्याकरीता व संदेशवेनाची लागत कमीत कमी ठेवण्याकरीता होतो.

## E Governance Model

१. **क्रिटीकल फ्लो मॉडेल :-**

या मॉडेलचा प्रमुख आधार क्रिटीकल व्हॅलु असलेली माहिती आहे क्रिटीकल व्हॅलु असलेली माहिती म्हणजे अशी माहिती जी प्रामुख्याने मिडीया किंवा विरोधी पक्षाकरीता असते ही माहिती मोठया डोमेनचा वापर करुन प्रसारित केली जाते. या मॉडेलकरीता १. विशिष्ट माहितीचे मुल्य समजणे २. माहिती प्राप्तीचे साधन शोधणे. ३. माहितीचा वापर ठरविणे या बाबी लक्षण ठेवणे महत्वाचे आहे.

**क्रिटीकल फ्लो मॉडेलचा उपयोग :** १. एका विशिष्ट मंत्रालय/ विभाग/कार्यालयाच्या भ्रष्टाचाराची माहिती त्या विभागाच्या संबंधित कार्यालयाला देण्याकरीता २. अनुसंधानाचे कार्य करण्याकरीता ३. वेगवेगळया कमिशनांव्दारे देण्यात येणा-या इक्वायरी रिपोर्टचा अभ्यास करण्याकरीता ४. गैरशासकीय संघटनांना आणि न्यायमंडळला

आवश्यक माहिती पुरविण्याकरीता ५. जाणुन बुजुन लपवुन ठेवलेली माहिती उदा. पर्यावरणासंबंधी माहिती, रेडीओ, ॲक्टीवसंबंधी माहिती संबंधीत कार्यालयाला किंवा विभागाला देण्याकरीता क्रिटीकल फ्लो मॉडेल वापर खालील प्रोजेक्ट करीता वापर केला जातो. 1. Transparency International – Daily corruption news 2. Human Right portal 3. Central vigilance committee 4. Human rights in china 5. Land property registration in Andra Pradesh

२. कम्परेटीव्ह ॲनालेसीस मॉडेल :-

सर्वात कमी वापरले जाणारे पण फारच महत्वपुर्ण असे मॉडेल होय. हे मॉडेल प्रामुख्याने अशा विकसनशील राष्ट्राकरीता फारच उपयोगी आहेत ज्यांना आता महत्व प्राप्त होत आहे. या मॉडेलचा वापर करुन अकार्यक्षम शासनाचा अभ्यास केला जाउ शकतो व अशा अकार्यक्षम शासनाला त्यांच्या मानव संसाधनावर होणा-या परिणामाचाही अभ्यास या मॉडेल व्दारे केला जाउ शकतो. या मॉडेलची सर्वात महत्वपुर्ण बाब म्हणजे यात असलेले असंख्य नेटवर्क आणि या नेटवर्कवर असलेली प्रचंड माहिती होय. या मॉडेलचा उपयोग १. मागील पॉलिसीचा अभ्यास करुन नवीन पॉलिसी तयार करणे. २. नवीन पॉलीसीची कार्यकुशलता मोजणे. ३. निर्णयप्रक्रियेत सहभाग घेणे. ४. विशिष्ट निर्णयाची माहिती संग्रहीत करुन ठेवण्याकरीता होतो. कम्परेटीव्ह ॲनालेसीस मॉडेलवर आधारित प्रोजेक्ट तयार केले जातात. १. Human Development Indicators 2. Comparative learning form disasters 3. Vote ph. 4. Green rating ministers (India) 5. Friends of the earth political action Committee.

३. ई- ॲडव्होकेसी/मोबाईलजेशन आणि लॉबींग मॉडेल :-

वैश्विक निर्णय प्रक्रियेकरीता वापरला जाणा-या सर्वात महत्वपुर्ण मॉडेलमध्ये ई ॲडव्होकेसी मोबाईलजेशन आणि लॉबीग मॉडेल चा समावेश होतो. हे मॉडेल नियोजित आणि डायरेक्ट फ्लो असलेल्या माहितीवर आधारीत असतो. या मॉडेलचा वापर करुन मानव संसाधनाचे मोबीलाईजेशन एका राष्ट्रातुन दुस-या राष्ट्रात, एका संस्थेतुन दुस-या संस्थेत करणे शक्य होते. या मॉडेलमध्ये व्हर्चुअल कम्युनिटी आणि रिअल कम्युनिटि असे दोन विभाग करुन कार्य संपन्न केले जाते. या मॉडेलचा उपयोग १. महत्वपुर्ण राष्ट्रीय मुद्यावर जनतेमध्ये डिबेट घडवुन आणणे व याच्या आधारे त्या मुद्यावरील भविष्यवाणी करणे. २. वेगवेगळे गृप निर्माण करुन निर्णय प्रक्रिया घडवुन आणणे ३. एका मोठया जनसमुदायाला राष्ट्रीय किंवा वैश्विक निर्णय प्रक्रियेत सहभागी करणे इ. बाबी या मॉडेलवर आधारित खालील प्रोजेक्ट तयार केले जातात. १. Green peace cyber activist community 2. Drop the Debt. Campaign 3. Independent Media Center 4. IGC Internet.

४. इंटर ॲक्टीव्ह सर्व्हीसेस मॉडेल :-

वर उल्लेखित सर्व मॉडेल्सचे एकत्रित स्वरुप म्हणजे इंटर ॲक्टीव्ह सर्व्हीसेस मॉडेल होय. या मॉडेलमुळे सामान्य जनतेला प्रत्यक्ष शासकीय कार्यात सहभागी होणे शक्य झाले आहे. या मॉडेलच्या अंतर्गत शासनाने जनतेकरीता राबविलेल्या योजना प्रत्यक्ष रुपाने जनतेसमोर उपलब्ध होतात. या मॉडेलचा वापर करुन १. निवडणुक २. सरकारी अधिका-यांची निवडणुक ३. ऑन लाईन न्याय निवाडा इ. बाबी संगणकावर घेणे शक्य झाले आहे. या. मॉडेलचा उपयोग : १. कर करणे २. राजस्व प्राप्त करणे. ३. पेमेंट ट्रान्सफर करणे. ४. विकेंद्रीकरणाचे फायदे होणे. ५. ऑन लॉन न्या निवाडा करुन भांडण संपविणे इत्यादी करीता कसा येतो. या मॉडेलवर आधारित १. Gyandoot(India) 2. Philippine customs retomm 3. Central Vigilace Committee (India) प्रोजेक्ट कार्यरत आहेत.

केंद्र सरकारचे नियम बनविण्याचे अधिकार :- डिजीटल सहीशी संबंधित नियम बनविन्याचा अधिकार सेक्शन १० मुळे मिळाला आहे. या नियमामध्ये पुढील प्रमाणे बाबी अंतर्भुत होतात.

१. डिजीटल सहिचा प्रकार
२. डिजीटल सही करतांना वापरावयाची पध्दत
३. डिजीटल सहिची पडताळणी करणारी पध्दत व प्रक्रिया
४. इलेक्टॅानिक रेकॉर्ड व पेमेंटची पुरेशी एकता, सुरक्षा व गुप्तता ठेवणे
५. डिजीटल सहि कायदेशीर करणे.

सरकारची भुमीका :-

माहिती तंत्रज्ञानाच्या साहयायाने लोकसेवा देतांना येणारे अडथळे दुर करण्यासाठी सरकारने पंचवार्षिक योजनेत आधिच माहिती तंत्रज्ञानाकरीता ३ ते ४ टक्के अर्थसंकल्पीय तरतुद केली आहे. संगणकाचा लोकांकडुन होणारा वापर बघता नागरिकांशी संबंधित सेवांचे संगणकीकरण प्राथमिकतेने करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. माहितीचे व्यवस्थित प्रसारण, संवाद व विविध विभागांची माहिती नीट पुरवण्यासाठी सरकार इंटरनेटचा उपयोग करीत आहे. संगळया मंत्र्यांना व त्यांच्या विभागांना जास्तीत जास्त माहिती इंटरनेटवर टाकण्याची सक्ती करण्यात येत आहे. यासाठी. सरकारने १. इंटरनेट २. माहिती तंत्रज्ञान सल्लागार ३. भाडेपटटीवर संगणक घेणे. ४. स्थानिक भाषेचा वापर ५. संगणकाप्रती जागरुकता निर्माण करणे या बाबतीत पावले उचलेली आहे.

निष्कर्ष :-

आधुनिक काळात माहिती तंत्रज्ञानात वाढ झाल्यामुळे विविध सरकारी कार्यालयाची माहिती व सरकारी कामकाजानुसार त्याचा उपयोग करणे शक्य होत आहे. सरकारी कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग जरी कठिण प्रक्रिया ठरत असली तरी त्याच्या सुनियोजन व सुरचनेमुळे ती प्रभावी ठरु शकत आहे. स्थानिक भाषेचा उपयोग होत असल्यामुळे सर्व सामान्य लोकांना सुध्दा इंटरनेट च्या साहयाने माहितीचा उपयोग करता येत आहे. स्थानिक व राज्याच्या भाषेत सगळी माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे येणा-या काळात या माहितीचा उपयोग. सर्वानांच होईल या बददल कोणतीही शंका नाही.

संदर्भ ग्रंथ :-

१. ईकॉमर्सची मुलतत्वे :- एस. एम. कोलते.
२. ई कॉमर्स मुलभूत सिध्दांत :- निना फडणवीस
३. ई कॉमर्स - डॉ. संजीवकुमार, अग्रवाल डॉ. शुभांगी दिघे